आपल्या परिसरातील ताज्या घडामोडींसाठी
Deshdoot Media Group
आजच डाऊनलोड करा, देशदूतचे मोबाईल ॲप!
ॲप डाऊनलोड करण्यासाठी
क्यूआर कोड स्कॅन करा!

शिल्पकार विकासाचा...

# देशदूत

पान ८
बारदान अपहारप्रकरणी एकावर गुन्हा
पंचवटीत टोळीयुद्धातून गोळीबार
अवैध गौणखनिज प्रकरणी १२१ जणांवर कारवाई
शेवटचे पान
मेहनतीच्या जोरावर विजय : पृथ्वीराज
८ पासून पाकिस्तान, न्यूझीलंड, आफ्रिका तिरंगी मालिका
भारत-पाकिस्तान सामना तिकीट विक्री १९ पासून

इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | नाशिक | वर्ष ५६ । अंक १५० । मंगळवार, दि. ४ फेब्रुवारी २०२५ । पाने १२ | किंमत ₹ ५ | मोबाईल आवृत्ती वाचा व वर

## संपादकीय

### महापुरुषांच्या विचारांची समाजाला गरज

देश आणि महाराष्ट्राला महापुरुषांची थोर परंपरा आहे. कारण ही भूमी संतांची, समाजसुधारकांची आणि राष्ट्रपुरुषांची आहे. इथल्या कणाकणांत तोच वारसा आहे. म्हणूनच मायभूच्या आरतीला सूर्य, चंद्र आणण्याची भावना कविवर्य सुरेश भट त्यांच्या एका कवितेत व्यक्त करतात. अशा थोर विभूतींच्या जयंती आणि पुण्यतिथी त्यांच्या विचारांची आठवण समाजाला करून देतात. काही दशकानंतरही अशा महान व्यक्तिमत्त्वांचा शोध आणि त्यांच्या कार्याचा बोध अनेक लेखकांना घ्यावासा वाटतो. कारण त्यांचे विचार कालातीत आहेत. त्याच विचारांचा वारसा माणसांनी पुढे चालवायला हवा, असे सगळेच म्हणतात. राजकीय पक्षांचे धुरिण संधी मिळेल त्या व्यासपीठावरून बेंबीच्या देठापासून सांगत असतात. दिवसाकाठी असा एक तरी कार्यक्रम पार पडतोच. श्रोतेही मान डोलवतात. पण त्यांच्या विचारांवर बोलणे हा बहुसंख्यांचा फक्त अभिनय असू शकेल का? महापुरुषांचे विचार हे घेण्यासारखेच आहेत. मात्र आजही लोकांना याचा विसर पडतो का? त्यांच्या विचाराप्रमाणे काही लोक तसे जगतही असतील. पण अशांची संख्या हाताच्या बोटावर मोजण्याइतकी तरी असू शकेल का? सामान्यतः काय आढळते? राजकीय पक्ष त्यांचे पुतळे बांधतात. व्यासपीठांवर त्यांच्या प्रतिमा लावून त्याचे पूजन करतात. पक्ष, सामाजिक संघटना, मंडळे त्यांची जयंती, पुण्यतिथी साजरी करतात. मिरवणुका काढतात. सगळीकडे महापुरुष अमर रहेच्या घोषणा दिल्या जातात. पण महापुरुष त्यांच्या विचारांनीच अमर राहू शकतात, याचा मात्र सर्वांनाच विसर पडलेला आढळतो. सगळ्याच महान व्यक्तिमत्त्वांनी जातीभेद-अंधश्रद्धा टाळा असे सांगितले. सामाजिक एकतेवर-शिक्षण प्रसारावर-मानवी मूल्यांवर, मानवतेवर भर दिला. नेहमी सत्य वाचे वदावे, असा उपदेश केला. हे विचार अमलात आणणे सर्वांनाच अंमळ कठीण वाटू शकेल का? कारण समाजात त्यावरच भर दिला जातो हे वास्तव आहे. स्वार्थाची पोळी भाजून घेण्यासाठी तेच सोयीचे वाटत असावे का? भेद तर इतके मुरलेले आढळतात की महापुरुषांचीदेखील जातीपातीत वाटणी केलेली आढळते. त्यांची जयंती-पुण्यतिथी साजरी कारण्यासाठीदेखील राजकीय पक्ष आणि लोक एकत्र येताना दिसत नाहीत. गावोगावी उभारलेले त्यांच्या पुतळ्यांच्या परिसरात फक्त विशिष्ट तिथींनाच स्वच्छता मोहीम राबवली जाते. कविवर्य कुसुमाग्रजांनी त्या अनावस्थेचे वर्णन समर्पक शब्दात त्यांच्या एका कवितेत केले आहे. त्यात 'माझ्या पाठीशी मात्र, फक्त सरकारी कचेऱ्यातील भिंती' असे महात्मा गांधीजींचा पुतळा म्हणतो. तथापि वैचारिकतेच्या वारशाच्या मुद्यावर ती सगळ्याच महापुरुषांची व्यथा ठरू शकेल का?

# भूमिका स्पष्ट करा

## ७६ लाख मते कशी वाढली?: उच्च न्यायालय

- विधानसभा निवडणुकीत सहानंतरच्या मतदानाला आक्षेप
- निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर आक्षेप
- केंद्रीय निवडणूक आयोगासह राज्य निवडणूक अधिकाऱ्यांना नोटीस
- १७ फेब्रुवारीला सुनावणी

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यात नुकत्याच पार पडलेल्या विधासभा निवडणुकीच्या निकालाबरोबरच सायंकाळी सहा वाजेनंतर झालेले मतदान आणि निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर आक्षेप घेत दाखल केलेल्या याचिकेची उच्च न्यायालयाने गंभीर दखल घेतली. न्यायमूर्ती अजय गडकरी आणि न्यायमूर्ती कमल खाता यांच्या खंडपीठाने केंद्रीय निवडणूक आयोगासह राज्य निवडणूक आयोग आणि निवडणूक मुख्य अधिकाऱ्यांना नोटीस बजावली. याचिकेत उपस्थित केलेल्या मुद्यांवर भूमिका स्पष्ट करा,असे निर्देश देत खंडपीठाने याचिकेची सुनावणी १७ फेब्रुवारीला निश्चित केली.

पान १० वर

### नव्याने निवडणूक घेण्यासाठी याचिका

विधानसभा निवडणूक प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात अनियमितता दिसून येत असल्याने आदर्श निवडणूक प्रक्रियेच्या तत्त्वालाच धक्का बसला आहे. निवडणूक आयोगाने या संदर्भातील माहिती देण्यास नकार दिला आहे. त्यामुळे संपूर्ण निवडणूक प्रक्रिया रद्द करावी. तसेच, नव्याने निवडणूक घेण्याचे आदेश निवडणूक आयोगाला द्यावेत, अशी विनंती या विविध याचिकांतून करण्यात आली आहे.

## २.३३ कोटी भाविकांचे अमृतस्नान



◉ प्रयागराज येथील महाकुंभातील वसंत पंचमीनिमित्त अमृतस्नानासाठी भाविकांमध्ये मोठा उत्साह दिसून आला. सरकारने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, सोमवारी २.३३ कोटी भाविकांनी अमृतस्नान केले.तत्पूर्वी १३ आखाड्यातील साधू-संतांनी संगमात स्नान केले. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी अमृतस्नानाच्या व्यवस्थेवर लक्ष ठेवण्यासाठी पहाटे ३.३० वाजता त्यांच्या शासकीय निवासस्थानी वॉर रूममध्ये बैठक घेतली. त्यांनी अधिकाऱ्यांकडून सातत्याने अपडेट्स घेत आवश्यक सूचना दिल्या.

( आणखी छायाचित्रे शेवटच्या पानावर)

## ७० लाख नवीन मतदारांवर राहुल गांधींचे प्रश्नचिन्ह

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**



लोकसभेला महाराष्ट्रात इंडिया आघाडीला चांगले यश मिळते. मात्र, त्यानंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीत पराभव होतो. या निवडणुकीत हिमाचल प्रदेशची जितकी लोकसंख्या आहे तितक्या नव्या मतदारांची नोंदणी मतदार यादीत केली जाते. लोकसभा आणि विधानसभा या निवडणुकीच्या काळात ७० लाख नवीन मतदार समाविष्ट करण्यात आले असे सांगत काँग्रेस नेते आणि लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सत्ताधारी भाजपसह निवडणूक आयोगावर प्रश्नचिन्ह उभे केलेत.

संसदेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर चर्चेत ते बोलत होते. यावेळी राहुल गांधी

पान १० वर

### खा. शिंदेंनी आरोप फेटाळले

शिवसेनेचे खासदार श्रीकांत शिंदे यांनी राहुल गांधी यांचे आरोप बिनबुडाचे असल्याचे म्हटले आहे. हा दावा (विधान) पूर्णपणे खोटा आणि बिनबुडाचा आहे. निवडणूक आयोगाने त्यांच्या वेबसाइटवर प्रत्येक मतदार यादी अपलोड केलेली आहे, असेही शिंदे म्हणाले.

### आशिष शेलारांचा पलटवार

मतदार वाढले तर चूक काय? मतदार वाढले त्यामुळे यांच्या पोटात का दुखतेय? लोकसभेच्यावेळी प्रत्येक मतदान केंद्रावर नावे गायब झाली म्हणून मतदार ओरड करताना दिसत होते. राहुल गांधी तुम्ही मतदारांची नावे गाळून लोकसभेत विजय मिळवला होतात का?, असा सवाल भाजप आमदार आशिष शेलार यांनी उपस्थित करत राहुल गांधी यांना प्रत्युत्तर दिले.

## संसदेत आरोप-प्रत्यारोप

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

अर्थसंकल्पीय अधिवेशनात संसदेच्या दोन्ही सभागृहात आज सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये महाकुंभमेळ्यात घडलेल्या चेंगराचेंगरीच्या घटनेवरून आरोप-प्रत्यारोप झाले. राज्यसभेच्या सभागृहाचे कामकाज सुरु झाल्यानंतर विरोधी पक्षाच्या खासदारांनी प्रयागराज येथील महाकुंभमेळ्यातील चेंगराचेंगरीचा मुद्दा उपस्थित केला होता. तसेच, या चेंगराचेंगरीच्या दुर्घटनेबाबत सभागृहात चर्चेची मागणी करण्यात आली होती. मात्र, विरोधी खासदारांची ही मागणी मान्य न केल्यामुळे खासदारांनी सभागृहात जोरदार घोषणाबाजी केल्याचेही पाहायला मिळाले.

काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे हे देखील सभागृहात बोलताना विविध मुद्यांवरून चांगलेच आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले. खरगे

पान १० वर

**महाकुंभ चेंगराचेंगरी प्रकरण**

## सुनावणीस 'सर्वोच्च' नकार

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

प्रयागराज येथील महाकुंभमेळ्यात झालेल्या चेंगराचेंगरीच्या घटनेनंतर अधिवक्ता विशाल तिवारी यांनी देशभरामधून येणाऱ्या यात्रेकरूंसाठी सुरक्षा उपाययोजना आणि मार्गदर्शक तत्त्वे लागू यावे, असे आदेश दिले जावे, याबाबतची एक जनहित याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली होती. मात्र, या याचिकेवरील सुनावणीस सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला. याचवेळी सर्वोच्च न्यायालयाने महाकुंभमेळ्यातील चेंगराचेंगरीची घटना दुर्दैवी असल्याचे म्हणत याचिकाकर्त्याला अलाहाबाद उच्च न्यायालयात जाण्याचे निर्देश दिले.

उत्तर प्रदेश सरकारची बाजू मांडणारे ज्येष्ठ वकील मुकुल रोहतगी यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाला सांगितले की, या प्रकरणाच्या चौकशीसाठी

पान १० वर

## भूखंड विकासासाठी एनए अट रद्द

**मुंबई । प्रतिनिधी**

भूखंड विकसित करण्यासाठी लागणारी अकृषिक वापर परवान्याची (एनए) अट रद्द करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. या निर्णयामुळे औद्योगिक क्षेत्राला मोठा दिलासा मिळाला असून नागरिकांना आपली जमीन एनए करून घेण्यासाठी होणारा त्रास वाचणार आहे. अकृषिक परवान्याची अट रद्द झाली असली तरी एखाद्या उद्योजकाला आपली जमीन विकसित करायची झाल्यास त्याला स्थानिक स्वराज्य संस्थेने दिलेल्या विकास परवानगीची प्रत महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांना सादर करणे आवश्यक असणार आहे.

उद्योगांच्या मालकीच्या जमिनीवरील कोणत्याही विकासासाठी एनएची अट अनिवार्य होती. त्यामुळे ही अट बांधकामासाठी एक मोठी अडचण मानली जात होती. एनए परवानगीची अट शिथिल करण्याची मागणी उद्योग क्षेत्रातून केली जात

पान १० वर

## तापमान घसरणार

**नाशिक । प्रतिनिधी**

येत्या बुधवार दि.१२ फेब्रुवारीपर्यंत पहाटेचे किमान तापमानात १ ते २ अंश सेल्सिअसपर्यंत घसरण्याची शक्यता आहे. त्यामुळे चढ-उताराच्या थंडीसह सकाळी हवेत गारवा व दुपारी कडक ऊन जाणवण्याची शक्यता आहे.

पावसाची शक्यता मावळून काहीशी थंडीची शक्यता वाढणे हा वातावरणातील बदल, सध्याच्या रब्बी पिकांसाठी लाभदायी ठरणार आहे. शिवाय ढगाळ व दमट वातावरणाची शक्यता दुरावल्यामुळे आता उशिरा लागवड झालेल्या रब्बी पिकांवर बुरशी, मावा, किडीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता नाही. सध्या किमान तापमान १३ ते १४ अंश तर कमाल तापमान ३३ अंशांपर्यंत जात आहे.




# सिंहस्थाचे सुक्ष्म नियोजन करा


## तयारी कुंभमेळ्याची : चहल यांच्याकडून सर्व विभागांचा आढावा

**नाशिक । प्रतिनिधी**

आगामी सिंहस्थ कुंभमेळ्यात गर्दी नियंत्रणासाठी सुक्ष्म नियोजन करणे गरजेचे आहे. प्रयागराजमध्ये घडलेली दुर्घटना खेदजनक असून, नाशिकमध्ये अशा प्रकारच्या घटना घडू नये यासाठी काळजी घेण्याची गरज आहे. नाशिक व त्र्यंबकेश्वर येथे २०२७ मध्ये होणारा कुंभमेळा कोणतीही दुर्घटना न होता, सुरक्षित पार पडण्यासाठी सर्वांनी सजग राहण्याच्या सूचना दिल्या. संत महंताचे निवास क्षेत्र सुरक्षित राहण्यासाठी साधूग्रामसाठी आवश्यक जादा जागेसाठी भूसंपादनाच्या प्रक्रियेला गती देण्यात यावी, बॅरिकेडस्‌साठी बांबूऐवजी स्टीलचे बॅरिकेडस् वापरावे, घाटांचे पुनरुज्जीविकरण करावे अशा सूचना गृहविभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. आय. एस.चहल यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

नाशिकमधील कुंभमेळा केवळ २ वर्षांवर येऊन ठेपल्याने राज्य शासनाकडून कुंभमेळ्याची जय्यत तयारी करण्यात येत आहे. त्याअनुषंगाने गेल्या ३ दिवसांपूर्वीच पालक सचिव एकनाथ डवले यांनी कुंभमेळा कामकाजाचा आढावा घेतला होता. त्यानंतर आज गृहविभागाचे

पान १० वर



### बांबूऐवजी स्टील बॅरिकेड्स वापरा

पोलिसांनी बॅरिकेडिंगवर लक्ष द्यावे. प्रयागराजमध्ये गर्दीमुळे लाकडी बॅरिकेडिंग तुटले. बांबूऐवजी स्टीलच्या बॅरिकेडिंग करण्याचा सल्ला त्यांनी दिला. गर्दीमुळे होणाऱ्या अप्रिय घटना टाळण्यासाठी, गर्दी नियंत्रणासाठी प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी करावी. भक्कम बेरिकेड्स उभारावेत. त्यासाठी संबंधित व्यावसायिकांशी संपर्क साधावा. गर्दी नियोजनासाठी स्वयंसेवकांची मदत घेता येईल का? याचीही पडताळणी करावी. त्याचे नियोजन पोलीस विभागाने करावे अशा सूचना यावेळी गृह मुख्य सचिव डॉ. आय.एस.चहल यांनी दिल्या.

### अधिकाऱ्यांकडून आढावा सादर

विभागीय आयुक्त डॉ.गेडाम यांनी कुंभमेळ्यातील कामांना गती देण्याचे निर्देश देण्यात आले असून, त्याबाबत सर्व विभागांचा नियमितपणे आढावा घेतला जात असल्याचे सांगितले. जिल्हाधिकारी जलज शर्मा यांनी कुंभमेळ्यानिमित्त सुरू असलेल्या तयारीची सविस्तर माहिती दिली. पोलीस आयुक्त कर्णिक, महानगरपालिका आयुक्त मनीषा खत्री, पोलीस अधीक्षक देशमाने यांनी आपल्या विभागातर्फे सुरू असलेल्या कामांची माहिती सादर केली.